लोकमत इन्फोग्राफिक्स

# छातीत जळजळ होत आहे, दुर्लक्ष करू नका?



आजाराचे योग्य निदान करून त्यावर उपचार

**ही लक्षणे?**

- छातीत दुखणे
- जळजळ होणे
- तोंडात आंबट चव येणे
- पाठीत दुखणे

**जळजळ हृदयविकाराचा झटका असू शकतो.**

**मुंबई :** छातीत जळजळ होणे ही सर्वसामान्य समस्या आहे. अनेकांना ही समस्या नियमितपणे भेडसावत असते. त्यामुळे अनेकजण या विषयाकडे फारसे गांभीर्याने पाहत नाहीत. घरगुती काही तरी उपाय करून या समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र, वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते काहीवेळा छातीत होणारी जळजळ हृदयविकारचा झटका असू शकतो. तर काही वेळा जठराचे विकार असण्याची शक्यता असते. त्यामुळे दुर्लक्ष न करता त्या आजाराचे योग्य निदान करून त्यावर उपचार घेणे गरजेचे असते.

गेल्या काही वर्षांत नागरिकांमध्ये विशेष करून तरुणांमध्ये आधुनिक जीवनशैलीचा वापर वाढला आहे. त्यामुळे खाण्यापिण्याच्या सवयी बदलल्या आहेत. चौरस आहाराकडे दुर्लक्ष करून जंकफूड आणि प्रोसेस फूड मोठ्या प्रमाणावर खाताना दिसत आहे. त्याचा परिणाम थेट पचनसंस्थेवर होत आहे. तसेच अनेकजण जेवल्यावर तत्काळ झोपतात. त्यांच्या खाण्याच्या वेळा नियमित नसतात. व्यसनाधिनता मोठ्या प्रमाणात वाढीस लागली आहे. या सगळ्या प्रक्रियेतून लोकांना मोठ्या प्रमाणात ॲसिडिटीच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहेत. ज्यावेळी आपण अन्न खातो तेव्हा ते पोटाच्या खालच्या भागात पोहोचते आणि पुन्हा त्यातील अन्नरस अन्ननलिकेमध्ये पुन्हा वर येऊ लागते त्याला ॲसिडिटी रिफ्लक्स असे म्हणतात.

छातीत होणारी जळजळ ही ॲसिडिटी नसते. काहीवेळा तो हृदयविकाराचा झटकाही असू शकतो. आमच्या रुग्णालयात आम्ही काही असे रुग्ण बघितले आहेत ॲंटासिड घरी घेऊन बसलेत. त्यानंतर काही कालावधीनंतर जास्त जळजळ झाली म्हणून परत आले तर त्यांना हृदयविकार असल्याचे लक्षात आले आहे. पुरुषाने २५ व्या तर महिलांनी ३५ व्या वर्षी तपासणी करावी.

- **डॉ. अजय चौरासिया**, हृदयरोग विभागप्रमुख, नायर रुग्णालय

छातीत वारंवार जळजळ होत असेल तर पोटविकारतज्ज्ञाकडे जाऊन एण्डोस्कोपी करून तपासून घ्यावे आणि आजाराचे निदान करून घ्यावे. कारण ॲसिड रिफ्लक्समुळे काही वेळा जठराचा कॅन्सरसुद्धा होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी वारंवार जळजळ होत असल्यास त्याकडे दुर्लक्ष करून नका.

- **डॉ. अमित मायदेव**, पोटविकारतज्ज्ञ, रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटल